# सप्तर्षी : भगवान नित्यानंदांसमवेत एक प्रसंग

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

भारतात असे बोलले जाते की, रात्रीचे आकाश सप्तर्षींमुळे प्रकाशित होते. हे सप्तर्षी, ते सात ऋषी आहेत, ज्यांच्या शिकवणी हजारो वर्षांपासून पूजनीय आहेत, ज्यांना दैवी प्रेरणेने शास्त्रग्रंथांमधील ज्ञान प्राप्त झाले आणि हे ज्ञान इतरांपर्यंत पोहोवण्याच्या कार्यास त्यांनी आपले जीवनसर्वस्व बनवले. यांमधील प्रत्येक ऋषींचे प्रतीक म्हणून एक-एक तारा आकाशात असतो. ते ऋषिगण आहेत कश्यप ऋषी, अत्रि ऋषी व भारद्वाज ऋषी, विश्वामित्र ऋषी व गौतम ऋषी तसेच जमदग्नि ऋषी व वसिष्ठ ऋषी. असे हे सात तारे एकत्र येऊन 'सप्तर्षी' हा तारकासमूह तयार होतो, ज्याला पाश्चात्त्य देशांत 'बिग डिपर' असे म्हटले जाते.

भारतात अनेक लोक या सात ऋषींची, सप्तर्षींची पूजा करतात. ही पूजा श्रावण महिन्यातील पौर्णिमेला करण्याचा प्रघात आहे आणि श्रावण महिना सहसा ऑगस्ट महिन्यात येतो. तरीदेखील असेही काही लोक आहेत की, ज्यांनी वर्षभर ही पूजा करण्याचे व्यक्तिगत व्रत जर घेतले असेल, तर ते ही पूजा वर्षभर करतात.

असेच व्रत एका अम्मांनी घेतले होते, ज्या सन् १९५०मध्ये मुंबईत राहत होत्या. प्रत्येक महिन्यातील पौर्णिमेच्या रात्री अम्मा पूजावेदीवर सात सुपाऱ्या ठेवत असत. प्रत्येक सुपारी एकेका ऋषींचे प्रतीक असे. अम्मा निरांजन आणि अगरबत्ती लावून पूजा करत; नाजूक पिसाच्या आकाराचा अगरबत्तीचा धुर वातावरणात मिसळून जाताच संपूर्ण वातावरण सुवासाने भरून जाई.

योगायोग असा होता की, या अम्मा भक्त होत्या एका महान सिद्धगुरूंच्या, सदेह गुरूंच्या, जे तानसा खोऱ्यातील गणेशपुरी गावात वास्तव्यास होते. त्या भगवान नित्यानंदांच्या भक्त होत्या.

एके वर्षी, उन्हाळ्याच्या दिवसांत या अम्मा बडे बाबांच्या दर्शनासाठी गणेशपुरीला आल्या. त्यांच्या मनात असा विचार होता की, थोडे दिवस गणेशपुरी गावात राहावे आणि मग पौर्णिमेच्या दिवशी घरी परत जावे, जेणेकरून त्यांना सप्तर्षींची पूजा करता येईल.

पौर्णिमेचा दिवस उजाडताच घरी जायला निघण्यापूर्वी बडे बाबांना भेटून त्यांचे दर्शन घेण्यासाठी अम्मा तयार झाल्या. त्या कैलास-निवासकडे जाणाऱ्या एका अरूंद रस्त्यावरून चालू लागल्या. कैलास-निवास ही ती नवीन इमारत होती, जी नुकतीच बडे बाबांना राहण्यासाठी बांधली गेली होती आणि इथेच ते आपल्या भक्तांना दर्शन देत असत. गावाचा परिसर त्यावेळी शांत होता. त्या काळी, काही मोजकीच घरे तिथे होती, जी एकमेकांपासून दूर अंतरावर होती आणि किराणा मालाचे एकच दुकान होते, जे बडे बाबांच्या सूचनेनुसार त्यांच्या शिष्यांनी सुरू केले होते, त्या गावाला भेट देणाऱ्या बाहेरगावच्या लोकांच्या सोयीसाठी.

अम्मा जेव्हा कैलास-निवासजवळ पोहोचल्या, तेव्हा त्याचा कळस त्यांच्या दृष्टीस पडला आणि त्यांना दिसून आले की, दरवाजे अजुनही उघडलेले नाहीत. म्हणून त्या बाहेरच बसल्या आणि त्यांनी वाट पाहायचे ठरवले. आजुबाजूला आणखीनही काही लोक इकडून तिकडे फिरत होते, त्यांच्यातील बरेच लोक दर्शन सुरू होण्याची वाट पाहत होते.

दहा मिनिटे होऊन गेली. वीस मिनिटे. एक तास, दोन तास आणि आता तर दुपारही व्हायला आली होती. उन्हाळ्यातील त्या दिवशी, तप्त गोलाकार सूर्य निळ्या आकाशात वर आला होता. अम्मांना आता चिंता वाटू लागली होती. एकीकडे असे होते की, त्या घरी जर लवकर परतू शकल्या नाहीत, तर त्यांच्या पूजेचा मुहुर्त म्हणजेच ती विशिष्ट वेळ चुकणार होती, ज्यावेळी त्यांना सप्तर्षी पूजा करायची होती. आणि त्यांना ही पूजा काही करून करायचीच होती. ही त्यांची नियमित पूजा होती, ज्याचे व्रत त्यांनी घेतलेले होते; सातही ऋषींना संतुष्ट करण्याचा आणि त्यांचे आशीर्वाद मिळवण्याचा हा त्यांचा मार्ग होता.

तरीदेखील — त्या अजुनही इथे गणेशपुरीतच होत्या, त्यांच्या गुरूंचे म्हणजेच बडे बाबांचे दर्शन घेण्यासाठी. बडे बाबांचे दर्शन घेतल्याशिवाय, आपण घरी परतत आहोत हे त्यांना सांगितल्याशिवाय आणि गाव सोडण्यास त्यांची संमती घेतल्याशिवाय अम्मा परत जाऊ शकत नव्हत्या.

इकडे आड आणि तिकडे विहिर अशा या पेचात त्या अम्मा अडकलेल्या असताना, त्यांचे लक्ष थोड्याच अंतरावर असलेल्या गरम पाण्याच्या कुंडांकडे गेले. झऱ्यांचे पाणी दोन आयताकृती कुंडांमध्ये सोडलेले होते, ज्यांमधून वाफा बाहेर पडत होत्या. दररोज पहाटे साधारण तीन वाजता बडे बाबा या गरम पाण्याच्या कुंडांमध्ये स्नान करत असत. आणि मग दिवसभर, बडे बाबांच्या दर्शनासाठी

आलेले लोकदेखील बरेचदा तिथे स्नान करत, श्रीगुरूंच्या समीप जाण्यापूर्वी स्वतःला स्वच्छ व शुद्ध करत असत.

आता वाटच जर पाहायची आहे, तर पटकन स्नान तरी करून घ्यावे असा विचार करून, अम्मा जागेवरून उठल्या आणि कुंडांकडे चालू लागल्या. त्या दिवशी इतके उकडत होते की, तिथे कुंडांच्या आजुबाजूला चिटपाखरूदेखील नव्हते; संपूर्ण कुंडे केवळ त्यांच्या एकटीचीच होती. साडीच्या निऱ्या त्यांनी हातात उंच धरल्या आणि त्या पाण्यात उतरल्या.

त्या स्नानाचा आनंद घेत असताना — त्यांच्या कमरेपर्यंत पाणी पोहोचले होते आणि पाण्याच्या छोट्या-छोट्या लाटांनी हळुवारपणे त्यांच्या सभोवती फेर धरला होता. आणि त्याचवेळी जवळूनच कुठुनतरी एक ध्वनी त्यांच्या कानावर पडला. खरेतर अनेक ध्वनी ऐकू आले : प्रसन्नतेने हसण्याचे व छोट्या-छोट्या व दुडुदुडु धावणाऱ्या पावलांचे आवाज. अम्मांनी सभोवार नजर टाकली आणि पाण्याच्या काठावर उभ्या असलेल्या लहान मुलांचा जमाव पाहून त्या आश्चर्यचकित झाल्या. तिथे एक, दोन — एकूण सात मुले होती आणि त्यांची वये पाच किंवा सहा वर्षांपेक्षा जास्त नव्हती.

त्या काही बोलणार त्याआधीच, त्या मुलांनी पाण्यामध्ये उड्या मारल्या आणि खेळायला सुरुवात केली. त्यांनी एकमेकांच्या अंगावर पाणी उडवायला सुरुवात केली; अम्मांच्या अंगावरही त्यांनी पाणी उडवले; ती मुले त्या कुंडांमध्ये सर्वत्र नाचत-बागडत धमाल करू लागली.

“ए मुलांनो,” त्या म्हणाल्या. त्यांच्या आवाजात गोडवा तर होताच, पण त्याबरोबरच ठामपणाही होता. “मी स्नान करते आहे, मला त्रास देऊ नका.”

थोड्याच वेळात अम्मा कुंडातून बाहेर आल्या. ओले कपडे बदलून त्यांनी कोरडे कपडे परिधान केले आणि त्या पुन्हा कैलास-निवासकडे जायला निघाल्या. तोपर्यंत टळटळीत दुपार झाली होती.

त्या जेव्हा कैलास-निवासजवळ पोहोचल्या, तेव्हा तेथील वातावरणात त्यांना फरक जाणवला : काहीतरी नक्कीच होते. एक अनोखी सतर्कता होती, काय घडेल-कसे होईल याविषयीची आशा होती. लोकांनी रांग लावण्यास, तयार होण्यास सुरुवात केली होती.

आणि मग, कैलास-निवासची दारे उघडली. एक सेवक लोकांना दर्शनासाठी आत पाठवू लागला. आणि तिथेच आतल्या बाजूस बडे बाबा विराजमान झाले होते.

दर्शनासाठी नंबर येताच अम्मा बडे बाबांसमक्ष आल्या. त्यांची मूर्ती कृष्णवर्णी आणि देदीप्यमान होती, असे जाणवत होते की, त्यांच्या उपस्थितीमुळे वातावरणातील कणांकणात काहीतरी विलक्षण गोष्ट भरून आहे, जादूभरे असे काहीतरी जे कदाचित दुष्प्राप्य वाटत होते; परंतु होय, बडे बाबांच्या सान्निध्यात त्याची उपस्थिती प्रबळतेने जाणवत असे : आणि ती जादुभरी जाणीव होती, प्रशांतीची. अम्मा नमस्कारासाठी वाकल्या.

आणि मग, बडे बाबा तिला म्हणाले :

“तुला सप्तर्षींचे दर्शन झाले तर?”

अम्मांनी वर बडे बाबांकडे बघितले, त्यांच्या नजरेत आश्चर्याचा भाव होता. भारतात लोक म्हणतात की, एखाद्या व्यक्तीचे व्रत, त्यांचे अनुष्ठान त्यावेळी फलीभूत होते, जेव्हा त्यांना त्यांच्या इष्टदेवतेचे दर्शन होते. अम्मांना त्या सात लहान मुलांचे स्मरण झाले. त्या एकटक बडे बाबांकडे पाहत राहिल्या.

त्यांच्या हृदयात, त्यांच्या मनात किंवा कदाचित अंतरीच्या एखाद्या असीम आणि देदीप्यमान स्थानी बडे बाबांचे शब्द प्रतिध्वनीत होत होते.

“तुला सप्तर्षींचे दर्शन झाले तर?”

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.